विशेष दिवाणी दावा क्रमांक ११/२०२१

निशाण क्रमांक ९३ / क

वादी तर्फे साक्षीदार क्रमांक २

| | | |
|---|---|---|
| नाव | - | विनायक आप्पासाहेब शिंदे |
| वय वर्षे | - | ३३ वर्षे |
| व्यवसाय | - | शाखा प्रंबधक, बँक ऑफ बडोदा, शाखा महागांव |
| राहणार | - | गडहिंग्लज, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर |

वादी तर्फे वकील एम. व्ही. पाटील यांचे मार्फत सरतपास सुरु

१. मी जुन २०२३ पासून शाखा प्रबंधक म्हणून बँक ऑफ बडोदा शाखा महागाव येथे कार्यरत आहे. सदरील शाखा सन २००९ पासून संगणकीकृत झाली. तत्पूर्वी लेजर सिस्टीमने काम चालत होते. संपूर्ण ऑन लाईन डाटा हा मुंबई येथील सी.बी.एस. डाटा सेंटर येथे सेव असतो. संगणक हाताळण्याचे अधिकार हे शाखा प्रबंधक, जॉईड मॅनेजर, कॅशीअर व क्लार्क यांना आहेत. बँक ही खातेदांराना बचत खात्याचे पासबुक जारी करते. पासबुक मधील नोंदी या संबंधीत लिपीक करतो. आमच्या बँकेचे जारी केलेले पासून दाखविल्यास मी ओळखू शकतो. मला आता बँक ऑफ बडोदाचे दोन पासबुक दाखविण्यात आले ते आमच्याच बँकेने दिलेले आहेत. सदरील पासबुक पैकी एक पासबुक हे हॅरी अडॅम फर्नाडीस व दुसरे पासबुक हे अॅनी हॅरी फर्नाडीस यांना दिलेले आहे. सदरील नोंदी या संगणीकीकृत आहेत त्यातील मजकूर हा बरोबर आहे किंवा नाही हे मी माझ्या सोबत आणलेल्या दोन्ही व्यक्तीचे खाते उता-या प्रमाणे चेक करुन सांगू शकतो. साक्षीदार यांनी त्याच्या सोबत आणलेल्या खाते उता-यावरुन साक्षीदारा मार्फत पासबुक पडताळण्यात आले. त्यापैकी हॅरी अडॅम फर्नाडीस याचे पासबुक व मी आणलेला

खाते उतारा यातील नोंदी या एकसारख्या आहेत व त्या रेकॉर्ड प्रमाणे बरोबर आहेत. तो खाते उतारा मी प्रकरणात सादर करु शकतो. सदरील खाते उता-या सोबत मी बॅर्कर्स बुक अॅक्ट प्रमाणे प्रमाणपत्र देखील सादर करु शकतो. सदरील पासबुकला निशाणी क्रमांक ९४ व त्याच्या सोबतच्या खाते उतारा-यास निशाणी क्रमांक ९५ व त्याच्या प्रमाणपत्रास निशाणी क्रमांक ९६ देण्यात येते. अॅनी फर्नाडीसच्या पासबुक मधील नोंदी या बरोबर आहेत. सदरील पासबुक हे आमच्या बँकेने जारी केलेले आहे. सदरील पासबुक यास निशाणी क्रमांक ९७ देण्यात येते.

प्रतिवादी तर्फे वकील व्ही. जी. देसाई यांचे मार्फत उलट तपास सुरु

२. मला साक्ष देण्याकरीता बँके कडून विशेष वटमुखत्यारपत्र किंवा अधिकारपत्र देण्यात आलेले नाही. साक्षीदार सांगतो की, बँकिंग अॅक्ट प्रमाणे प्रबंधक म्हणून सदर अधिकार मला प्राप्त होतात. सदरील बँकिंग कायदा व त्याचा कलम मला माहिती नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, देना बँक व बँक ऑफ बडोदा या दोन्हीही राष्ट्रीयकृत बँका आहेत. देना बँक व बँक ऑफ बडोदा याचे व्यवहार स्वंतत्र होते. हे म्हणणे बरोबर आहे की, सन २०१८-२०१९ पर्यंत महागांव येथे देना बँक होती. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१८-२०१९ साला पर्यंत बँकेचे व्यवहार संगणकीकृत झाले नव्हते. हे म्हणणे बरोबर आहे की, बँकेमध्ये कामकाजा संदर्भात लोन, बचत खाते व इतर व्यवहार असे वेगवेगळे खाते आहेत. हे म्हणणे बरोबर आहे की, सन २०१९ पर्यंत देना बँकेत कोण कोण शाखा प्रमुख व उपशाखा प्रमुख व कर्मचारी होते याबाबत मी सांगू शकत नाही. तसेच सन २०१९ साला पर्यंत काय काय व्यवहार झाले याबद्दल मला व्यक्तीगत माहिती नाही. धनादेश बँकेत जमा झाल्यापासून पाच वर्षानंतर ते नष्ट करण्यात येतात. सन २०१९ च्या पूर्वीचे धनादेश, डिमांड ड्राफ्ट हे बँकेत उपलब्ध नाहीत. पासबुकातील नोंदीची वैयक्तीक

माहिती मला नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, सन २०१९ पूर्वीचे कोणतेही रेकॉर्ड बँकेत उपलब्ध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आणलेल्या दस्ताप्रमाणेच पासबुक मधील मजकूर आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला

फेरतपास नाही.

वा.दा.का.दा.

श्रवणोत्तर स्विकृत

दिनांक २०/०१/२०२६

सही/-

( न.श्री.पुरी )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
गडहिंग्लज